॥ नटेश्वर प्रसन्न ॥

संगीत गोपीचंद नाटक.

(तीन अंकी.)

रचणार

अनंत वामन बरवे.

संपादक—*नाट्यकला*, नारायण पेट, पुणें.

प्रकाशक

गजानन चिंतामण देव,

बुकसेलर, सदाशिव पेठ, पुणें.

मुद्रक

रावजी श्रीधर गोंधळेकर, जगद्धितेच्छु प्रेस, शनवार पेठ, पुणें.

सन १९०९

किंमत बारा आणे.

आवृत्ति दुसरी.

नाटकाचा सारांश.

गोपीचंदाची कथा सर्वप्रसिद्ध आहे; तेव्हां तिचा सारांश देण्याचें कारण नाहीं. तथापि या नाटकप्रयोगासाठीं तीच कथा कशी योजून घेतली आहे हें प्रेक्षकांस प्रत्यक्ष प्रयोग पहाण्यापूर्वी समजावें ह्मणून अंकानुक्रमानें यापुढें आह्मी योजिलेलें त्या कथेचें संविधानक देतों:—

अंक पहिला:—मंगलाचरण झाल्यावर गोरख व कानिफ यांची अकस्मात भेट, एकमेकांच्या गुरूंची माहिती, त्यांच्या मुक्ततेची प्रतिज्ञा.—गोपीचंदाच्या दासी जलमंदिराकडे जात असतां जालंधर व महाराणी मैनावती यांच्या संबंधानें त्यांचीं भाषणें—मैनावती व गोपीचंद बोलत बसले आहेत तों कानिफनाथ आल्याचें त्यांना वर्तमान समजतें.—कानिफनाथांचा क्रोध शांत केल्यावर जालंधरनाथांना खाईतून काढण्याविषयींचा विचार होतो.

अंक दुसरा:—स्त्रीराज्याच्या हद्दीवरील मारुतीचें देवालय.—एका कर्नाटकी वारांगनेबरोबर स्त्रीवेषानें तबलजीचें काम पत्करून गोरखाचा स्त्रीराज्यांत जाण्याचा बेत.—हद्दीवरील चौकीवर प्रवाशांच्या तपासणीबद्दल चौकीदाराचा फाजील शहाणपणा—स्त्रीराज्यांतील परिमळा राणीचा दरबार, तेथें वारांगनेचें नृत्य, गोरखाची गुप्त सूचना, मच्छिंद्रनाथाची थांदल, उभयतांची भेट.

परिमळेची समजूत करून जालंधरनाथांच्या मुक्ततेसाठीं मच्छिंद्र-नाथ व गोरखनाथ हे स्त्रीराज्यांतून निघतात.

अंक तिसरा:—गोपीचंदाची मुमुक्षुवृत्ति—मच्छिंद्रनाथ, कानिफ, गोरख येऊन खाईतून जालंधरनाथास बाहेर काढतात. गोपीचंदाचा जोग—गोपीचंदाची स्त्री मोहनाराणी व बहीण चंपावती बागेंत दासींसहवर्तमान करमणूक करीत बसल्या असतां गोपीचंदाची जोगीवेषानें भेट, त्यांचा संवाद. गोपीचंदाची मोह-विन्मुखता. जालंधरनाथांचा प्रसाद. जोगीवेष उतरून पुनः गोपी-चंदाचें राज्यारोहण.

पहिल्या अंकांतील पात्रें व देखावे.

सूत्रधार आणि त्याचे दोघे पारिपार्श्वक.

कानिफनाथ—जालंदरनाथाचा शिष्य.

गोरखनाथ—मछिंद्रनाथाचा शिष्य.

मलयगंधिनी.
केशरंजनी.
विशालाक्षि.
शीतवर्षिणी.
प्रियदर्शिनी.
मंजुभाषिणी.
} गोपीचंदाच्या दासी.

रूपक्या—गोपीचंदाचा खुषमस्कऱ्या.

अतिशयोक्ति—रूपक्याची बायको.

मैनावती—गोपीचंदाची आई.

गोपीचंद—सुंदरपूरचा राजा.

१ देखावा—आंब्याचें झाड. आंबे खालीं पडणें व पुन्हां त्यांतले कांहीं वरती जाऊन लटकणें.

२ देखावा—तिसऱ्या प्रवेशांत सज्जाचा देखावा. मैनावती उंच आसनावर असून शेजारीं खालच्या अंगास गोपीचंदाची बैठक.

॥ नटेश्वर प्रसन्न ॥

संगीत गोपीचंद नाटक.

(रा. रा. अनंत वामन बरवेकृत.)

अंक पहिला.

(धृपद—परब्रह्म मुळनिधान.)

नमो नाथ आदिनाथ ॥ सचराचर भूतनाथ ॥ पदप्रणतसंकटहर ॥न०॥ चरणकृपें तव अनाथ ॥ होत भक्तगण सनाथ ॥ भवजलधिहि त्यास सुतर ॥ न० ॥ विषयभोग रोग गमति ॥ योगनिरत होति वृत्ति ॥ दत्तगुरु जय दिगंबर ॥ न० ॥

(चाल—नमित मी त्या घननील मुकुंदा.)

गुरुचरणाब्जविलीन मधुप मन ॥ तरिच मिळे कैवल्यसुखासन ॥ गु० ॥ अभयगुरुकृपाकर तो मिळतां ॥ उद्धरतां ये भवजलपतिता ॥ नातरि षड्‌रिकरीं सांपडतां ॥ होय कसें भवबंधविमोचन ॥ गु० ॥

(पद्य संपण्याचे सुमारास पडद्यांत 'अहलख' 'जय गुरुनाथ' असे शब्द होऊन एका बाजूनें कानिफ व एका बाजूनें गोरख येतात.)

कानिफ—बेटा, धन्य है तूं.

गोरख—श्रीगुरूका स्मरण तूनें यथार्थ किया.

कानिफ—यह तेरी गुरूनाथकी अस्तुती सुनकर बहोत आनंद हुवा.

गोरख—इसी राहसे चलनेमें तेरेपर अवश्य गुरुकी कृपा होगी.

(पारिपार्श्वक जातात. सूत्रधार पुढें येतो.)

सूत्रधार—साई, आपणा उभयतांना मी प्रणाम करतों.

गो० का०—कल्याण, कल्याण !

सूत्रधार—अहाहा! खरोखर आपल्या रूपानं मला ह्या परमेश्वर-मूर्तीच भेटल्या असं म्हटलं पाहिजे. माझं मोठंच भाग्य हें.—

(चाल—साध्य नसे मुनि कन्या)

मंगल या स्तवनानें॥जणुं दर्शन हें दिधलें प्रभुनें॥मं०॥ अज अव्यक्त प्रभुची विभुती ॥ विषयांधा या दृश्य नव्हे ती ॥ म्हणुनि अनुग्रह करितो ॥ कीं तो विच-रुनि या रूपानें ॥ मं० ॥ सहवासें जी सेवा यांची ॥ घडुनि रुचि मिळे बोधसुधेची ॥ होते परमार्थाची ॥ प्राप्तिच आम्हां या योगानें ॥ मं० ॥

—सांईमहाराज, चरणापाशीं या दासाची एक विनंति आहे.

गो० का०—हां? वो क्या भला?

सूत्रधार—आपल्या आशिर्वादानं नेहमीं असं असावं हा हेतु आहे.—

(चाल—शृंगा ताडोनी डोहीं)

पुण्यकथाश्रवणीं ॥ उत्सव ॥ राहु अखंड जनीं ॥ त्यां-तिल हितवचनीं ॥ अविरत ॥ रत व्हावें त्यांनीं ॥ स-त्कविकृतिचा आदर ठेवुनि ॥ बोधामृतपानीं ॥ प्रेमें ॥ विहरंत दिनरजनीं ॥ प्रेमें ॥

गोरख—जा बेटा, सद्‌गुरुनाथकी कृपासे यह तेरी मनषा अवश्य पूरी होगी.

कानिफ—सुन बेटा, सामने आमका वृक्ष है. उसिकेपास जाकर खडा रहे. हमारी आग्यासे वो तेरेको परशाद देगा. यह परशादी सद्गुरुकी है ऐसा समझ हो.

(सूत्रधार आंब्याच्या झाडाजवळ जातो. झाडावरून एकाएकीं आंबे खालीं पडतात. ते तो वेंचून घेऊं लागतो.)

गोरख—सांई, आप कौन हो; कहासें आये; आपके गुरुकी क्या यही करामत है ?

कानिफ—सांई, सुनलीजिए. मय गुरु जलंधरनाथका चेला कानीफ हूं. गुरुकी आग्याके अनुसार कई प्रमत्त राजपुरुषोंको सद्गुरू परभावसे अंकित कर नाथदीक्षा देते देते अब मय आपने गुरूको मिलने चला हूं. आप हमारे गुरूकी करामत पूछते हो तो ऐसे आप कौन; आपका गुरु कौन; और आप किसराहपर चलते हैं ?

सूत्रधार—(पुढें येऊन) सांई, आज्ञेप्रमाणं प्रसाद ग्रहण केला.

कानिफ—क्या, इतनाहि बस हो गया ?

सूत्रधार—सांई महाराज,—

(चाल—भूपती खरे ते वैभव.)

प्रभु अनंतकर जैं सिद्ध होत द्यायाला ॥ तई नर छिकर हा समर्थ किति घ्यायाला ॥ घन उदारमतिनें संवर्षे जळधारा ॥ मनुजांस दुर्धर तो वारांदीं सारा ॥ ईश्वरी दयाळुत्व हें अंतरीं ठसतां ॥ वासना न ये मग मुळीं प्रबळ ठेवीतां ॥

कानिफ—बराबर है बेटा; भगवत्कृपाके ओर ध्यान दे कर ऐसी संतोख बृत्ति रखनेसेहि यह वासना निर्मूल होसकती है. नहीं तो भोगादिकसें हम उसको पूर्ण करते शांत करेंगे ऐसे कहें तो यह बिलकुल अशक्य है. स्नेह या घृत डालनेसे अग्निज्वाला अलबत बढ जाती है. शांत नहीं होती.

सूत्रधार—खरं आहे. असो, आतां आज्ञा असावी.

कानिफ—जा बच्चा, आनंदमें रहे.

गोरख—सद्गुरुनाथ तेरा भला करे.

(सूत्रधार प्रणाम करून जातो.)

गोरख—साईं साहाब, अब ये नीचे गिरेहुवे आम काहेको ऐसे रहेनें देते हो; फिर ये सब उसी वृक्षको लटका दीजिए.

कानिफ—अब यह आम फिर उसी जगेह लगाना इसीमें आपके गुरूकी जो कुछ करामत हो, दिखलाईये.

गोरख—अच्छा तो गुरूकी कृपासे वैसाभि हो जायगा.

(पडलेल्या आंब्यांस उद्देशून)

जाव, आपने आपने जगेहपर सब लटक जाव !

(उरलेले आंबे सर्व झाडाला जाऊन चिकटतात.)

कानिफ–वाहवा ! बेशक आप किसी सच्चे गुरूके चेले है. कहिये आपका नाम और गुरुसंप्रदाय.

गोरख–सांई, तात्विकदृष्टिसे मय आपको उत्तर दूं तो मेरा गुरु सच्चिदानंद सरूप है. सब अविद्या जलाकर उसीकी कियी हुई रख्छा यह मेरे शरीरको अलंकाररूप हो रही है. अखंड तत्वचिंता यह मेरी जपमाला है. संपूर्ण नामरूपकी झोली करके उसीमें चारो मुक्ति डालकर मैने आपनी बगलमें दबा रख्खी है. नाथ संप्रादयका प्रसार यह सैली गलेमें धारन कर, बरम सत् जगन्मिथ्या यह शृंगीनाद करते करते मय चलाहूं.

कानिफ—(प्रेमानें भेटून) वाहवा ! तो आपकी और हमारी येकही राह है !

गोरख—सत् है. अब वेव्हारदृष्टीसे कहें तो मय मछंदर नाथका चेला हूं. मेरा नाम गोरख. मयभि उनकी आग्याके अनुसार अनेक दुष्ट चक्रवर्तियोंको शासन करते हुवे नाथसंप्रदायका उपदेश करते करते आपने गुरूसें मिलने चलाहूं. सुनो कानिफनाथ, फिरते फिरते तुम्हारा गुरु जो जलंधरनाथ उनकी कुछ कुवार्ता समझनेमें आई, वो ऐसी के, बंगालेकी ओर एक सुंदरपूर नामका शहर है. वहांका राजा गोपीचंद, बडा उन्मत्त है. उसीने गुरू जलंधरनाथको खाईमें डालकर ऊपर घोडेकी लीद फेंक दियी

है. तुम आपने गुरूके सच्चे चेले हो तो उनको खाईमेंसे निकालनेकी शीघ्र तजवीज करो.

कानिफ–अवश्य करेंगे. हमारे गुरूका पता तुमने बतलाया इसके बदले अब हमभि आपके गुरूकी वार्ता जो सुनी है वो केहेताहूं. सांई, तुह्मारे गुरू मछंदरनाथ, मलियाल देसके इस्त्रियोंके राज्यमें वहांकी रानी जिसको परिमला कहेते हैं उसीके प्रेमजालेमें फंस रहे हैं. तुम उनके सच्चे चेले दिखते हो तो उनको उस जालेमेंसे छुडाना तुह्माराभि कर्तव्य है.

गोरख–बहोत अच्छा. आप बंगालेकी तरफ जाईये. मयभि मलियालके इस्त्रियोंके राज्यमें जाकर किसीभि करामतसे आपने गुरूको लेकर उस सुंदरपूर शहरमें आतां हूं. अब आपका पुनर्दर्शन यहां होगा.

कानिफ–अच्छा, आदेस. आदेस.

गोरख–आदेस, सांई आदेस !

(' अहलक ' करीत दोघे दोहोंकडे निघून जातात.)

प्रवेश २ रा.

(स्थल–गोपीचंद राजाचे जलमंदिरा बाहेरचा भाग–पात्रें, कांहीं परिचारिका लहान लहान कलश व अभ्यंगस्नानाचें साहित्य घेऊन येतांना दृष्टीस पडतात.)

सर्वजणी–(मिळून पुढील पद्य ह्मणतात.)

(जयप्रभोविभो अगाध० या चालीवर)

हं चला चला चला सकल सखि मिळुनी ॥ घ्या कनक कलश करिं भरुनी ॥ चला० ॥ बहुविध सुफुल स्पर्शसुखावह अंगराग सगळे ॥ निर्मियले सुपरिमळें तैलजलें ॥ हं चला० ॥ अतिशय सुंदर मणिमय मंदिर अलकेलिस्थल तें ॥ जणुं फुलतें किति सुखतें मन

भुलते ॥ हं च० ॥ सुरत्नभूषणखचितप्रांगण खचित नभोगणसे ॥ भासतसे शशिविलसे नृपति तसे ॥हं०॥

मलयगंधिनी—अग पण महाराजांची स्वारी दरबारांतलं काम संपवून जलमंदिराकडे गेली का ?

केशरंजनी—तें सांगायला आत्तां आपला रूपकया येईल. तंवर महाराजांना आज अभ्यंगस्नान घालतांना कुणी कुणी काय काय कामं वांटून घ्यायचीं तें ठरवून ठेवूं या ह्मटलं.

विशालाक्षि–हो गडे, बरं सुचवलंस. ह्मंजे मग गोंधळ व्हायला नको. ऐका, या; मीच सगळ्या जणींच्या कामाची योजना करत्यें अं. तूं केशरंजनी, महाराजांचे केंस विंचरण्याचं काम तुझ्याकडे बरं का; तूं मलयगंधिनी, महाराजांच्या अंगाला परोपरीच्या सुवासिक उट्या लावण्याचं काम तुझ्याकडे, समजलीस; तसंच तूं ह्मटलं शीतवर्षिणी, तूं महाराजांवर हळुहळु जलसिंचन करायचंस; आणि तूं बरंका प्रियदर्शिनी, महाराजांपुढें आरसा धरून उभं राहण्याचं तुझं काम.

शीतवर्षिणी–वः विशालाक्षि. तूं तर आज प्रत्येकीकडे तिच्या तिच्या नांवाप्रमाणंच कामांची योजना करून दिली आहेस.

मंजुभाषिणी–मुद्दामच केलंय तिनं तें. ह्मंजे एक तर अशानं कुणी आपलं काम कोणतं हें विसरून जायचं नाहीं; आन् दुसरं असं कीं, तिलाही मग आपल्याकडे आपल्या नांवाला योग्य असंच एखादं काम घ्यायला सांपडेल.

केशरंजनी–पण विशालाक्षीकडं तिच्या नांवाप्रमाणं ह्मंजे कोणतं काम देतां येण्यासारखं आहे बर ?

मंजुभाषिणी-अगदींच सोपं ! अग हिनं नुस्तं तिथं उभं राहून महाराजांचा तो मनोहर अभ्यंगस्नानविधि आपल्या विशाल दृष्टीनं स्वस्थ पहात असायचं !

(सर्वजणी हंसतात.)

केशरंजनी–तरी ह्मटलं आमची मंजुभाषिणी आहे !

वचनें निघातिल काय असार ॥ समजोनी कशी ती म
मानूं विमूढ बनोनी ॥ गुरूच्या वचनीं भरं० ॥

मछिंद्रनाथ—क्या बेटा गोपीचंद, फेर तेरेको शंका और डर तो नहीं उत्पन्न हुवा ?

गोपीचंद—नाहीं महाराज. शंका, भीति आणि अभिमान या तिन्ही विकारांची रक्षा या तीन पुतळ्यांच्या बरोबरच या ठिकाणीं झाली आहे. हा पहा आतां केवळ गुरुनिष्ठ शुद्ध अंतःकरणाचा आपला शिष्य आपल्या आज्ञेप्रमाणें त्या खाईजवळ जाऊन खाई-महाराजांना आदेश करतो आहे.

गोरख—(एकीकडे)—इतना पाक हुवा होय तो तुं गुरु-नाथकी कृपासे अब खाक नहीं हो जायगा.

गोपीचंद—खाईमहाराज आदेश !

जालंधरनाथ—(आंतून) अरे बार बार कौन आदेस कहेता है ?

गोपीचंद—हा सद्गुरुचरणीं लीन असा मैनावतीचा पुत्र गोपीचंद आहे.

जालंधरनाथ—कौन कहा ? गोपीचंद ?

गोपीचंद—होय तोच गुरुनाथांचा एक महदपराधी.

जालंधर—क्या अबतक तुं जिंदा है बेटा ?

गोपीचंद—नाथ माहाराजांच्या कृपेमुळं जिवंत आहें.

जालंधरनाथ—आच्छा; तो उसी कृपासे अब तू चिरंजीव हो जा!

(सर्वजण आनंदित होतात.)

मैनावती—(गोपीचंदाला प्रेमानें पोटाशीं धरून)—धन्य धन्य झालास बेटा तूं.

(चाल—रंगिले रसिले छबितोरि.)

तव हें मुख ये कुरवाळुं दे ॥ कवटाळूं दे अशी ॥
जणुं फिरूनि नव सुत सुख हें मिळे ॥ ये ॥ तव०॥

... ...

गोपीचंद—(नम्रपणानें)—

अर्थसिद्धिसाधक तनुची ॥ प्राप्ति ही कृपा मुळि तुमची ॥ भेटहि तिजला वरि करवोनी सद्गुरुची ॥ अचल अमरपदि धन्य होय जगतामधें ॥ ... ...

मैनावती—

... ये तव हें मुख ये कुरवाळुं० ॥

कानिफ—(खाईजवळ जाऊन)—गुरुनाथ, मय कानिफ आदेश कहेता हूं !

जालंधरनाथ—(आंतून)—आदेश !

गोरख—मय गोरखभि आदेस कहेताहूं.

जालंधरनाथ—आदेश !

मछिंद्रनाथ—सांई; मय मछंदरनाथ आपके दर्सनके लिये यहां खडा हूं.

जालंधरनाथ—कौन? मेरा भाई मच्छंदर?

(सर्व ' अलख ' करतात. त्याबरोबर चहूंकडे प्रकाश पडून जालंधरनाथ खाईतून अधर वरतीं आलेले दृष्टीस पडतात.)

सर्वजण—(जालंधरनाथावर पुष्पवृष्टि करीत)—

(चाल—हाय हाय हाय ॥ मे बेचारी दुःखीप्यारी.)

शांत शांत शांत ॥ महदपराधी धरुनि कुबुद्धी आधि अवनिधी दिली उपाधी न व्हा पराधी ॥ शांत० ॥ सद्गुरुनाथ सद्गुरुनाथ ॥ हा प्रणिपात हा प्रणिपात ॥ क्षमा करावी ॥ शांति वरावी ॥ क्षुब्ध हृदय वृत्ति स्थिर व्हावी ॥ कृपादृष्टि या जनीं असावी ॥ वत्सलता दृढ मनीं वसावी ॥ शां० ॥

(जालंधरनाथांना त्यांचा हात धरून मच्छिद्रनाथ पुढें आणतात. मागील सर्व देखावा बंद होतो. सर्वजण पायां पडतात. मैनावती पुष्पहार घालते.)

मैनावती—गुरुमहाराज, दासीची चरणापाशीं एक विनंति आहे आतां.

जालंधरनाथ—वो क्या ?

मैनावती—महाराज,—

(चाल—मनोनेत्र गुंतले लुब्ध झाले.)

अपुल्या कृपाकरें ॥ वांचवीलें ॥ संकटीं असें ॥
भुवनांत या अतां ॥ धन्य केलें ॥ पाहिजे तसें ॥ मुक्त
करा पूर्ण त्याला ॥ भवचक्रांतूनि या ॥ मु० ॥

जालंधरनाथ—सुन माई, जब तेरा बेटा नाथदीक्षा धारन करेगा तब तेरा यहभि खियाल पूरा हो जायगा.

मछंदरनाथ—सत् है. मनसे और तनसे बिना जोगलियेके जन्ममरनरूप इस संसारसे मुक्त होना असाध्य है.

गोपीचंद—मग महाराज या गोष्टीला आतां विलंब कशाला वरं—

(चाल—माझें हृदय पोळत धैर्य गळत.)

या कश्मलयुत भवजलधित कां निपतित मजसि
पाहतां ॥ या० ॥ अनुतापें चित्तशुद्धि आधिं जाहली ॥
पूर्ण विरक्त स्थिति ही मग ठसावली ॥ सद्गुरुची
सदय शांत मूर्ति भेटली ॥ मग का भयविमुखा परम
सुखा मज त्या मुकवीतां ॥ या०॥

जालंधरनाथ—अच्छा तो चलो. बेटा कानिफ, जोगदीक्षा लेनेवालोंको किस तयारीसे रहेना चाहिये यह इसको बतलाइये.

कानिफ—जैसी आग्या. सुन गोपीचंद,—

(चाल—घोर संसार तरु मुग्ध कोरक.)

आस सबकी छोड ॥ विखयज मोह तोड ॥ देहममता
फोड ॥ जोड तूं ब्रह्मसे ॥ आ० ॥ निश्चलासन उपर ॥
बैठकर ध्यान धर ॥ मंत्र पढ दिगंबर ॥ अमर कर
आपको ॥ आ० ॥

गोपीचंद--(नम्र होऊन)-गुरुमहाराज—

(चाल-पूर्वी अधरोष्ठावरी सखिच्या.)

उपदेशाक्षर वचनें अपुलीं शिरसा आदरिलीं ॥ वज्र-लिपीपरि हृत्पटलावरि मुद्रितशीं ठरलीं ॥ तापत्रय-तप्तावरि वृष्टीच अमृताची झाली ॥ त्रैलोकींच्या साम्राज्याची माळ गळां पडली ॥

(सर्व जातात)

प्रवेश दुसरा.

स्थळ-बाग.-पात्रें-मोहनाराणी व चंपावती झोंपाळ्यावर बसल्या आहेत व दासी त्यांना झोंके देऊन पुढील गाणें ह्मणताहेत, नाचताहेत असा देखावा.

सर्व दासी—

(चाल-जिवलग प्रिया नका जाउं थांबा.)

परिजन मिळे सभोंवार खेळे ॥ हलवित झोले सदा डुले ॥ कुणि गुंफित राही तिथें फुलें ॥ कुणि सादर सेवेमधें झुले ॥ कुणि नटूनि थटूनि पहा खुले ॥ जैंवि सखिसह देवि गौरी विहरतांना शोभली ॥ तैंवि येथें कौतुकानें उभयतां हीं बैसलीं ॥ करूनि गायन ॥ तसेंच नर्तन ॥ विनोद भाषण ॥ प्रसन्नवू मन॥ (नाचत) छुं छननन छुं छननन छुमछुम छनन छुमछुम छननन छुं छुं॥छुछुछुम छा छुछुछुम छा छुछुछुमछा॥ परि० ॥

मोहनाराणी--(चंपावतीस) वन्सं तुम्ही तरी दोन दिवस आपल्या सासरनं इथं आला आहांत, त्यामुळं तितकीच ह्मटलं करमणूक होतेय ही.

चंपावती–मी येऊन उपयोग काय? दादाच्या भेटीकरितां मी इथं आल्यें; पण आज किती दिवस झाले; एका शहरांत, एका वाड्यांत असून आमची भेट नाहीं.

मोहनाराणी–तुम्ही किती दिवसच म्हणतां, पण मी म्हणत्यें किती महिनेसुद्धां झाले असतील. महालाकडे येणंच टाकलंय अगदीं! सदां पहावं तर आपल्याशीं एकांत आणि उदास स्थितींत असायचं. ही वृत्ति अलीकडे बाई फारच वाढत चालली आहे. शेवटीं मेली अजिवात संसारांतनं उठायला तिकडे लावील कीं काय अशी मला भीति वाटते.

चंपावती—चल वहिनी, काय भलतंच मनांत आणतेस हें! माझा दादा कांहीं इतका वेडा नाहीं.

मोहनाराणी–इकडून नसायचंच कोणी वेडं. म्हणेल कोण? पण भोंवतालचीं सगळीं माणसं, आन् त्यांतनंहि सासूबाईसारखीं मायेचींच माणसं जर बळं एकेक वेड लावूं लागलीं, तर मग काय करायचं आहे?

चंपावती–आईसाहेबांनीं तें कायग केलंय असं?

मोहनाराणी–मूळ प्रथम जालंधरनाथांच्या भजनीं तर त्याच लागल्या होत्या.

चंपावती–मग त्यांत काय वाईट झालं? त्यांचा सर्व संसार झालेला आहे. आतां त्यांचं लक्ष इकडे प्रपंचांत न राहतां कुणा तरी सद्गुरूच्या अनुग्रहानं परमार्थाकडे लागेल तितकं बरंच; नाहीं का?

मोहनाराणी–होय. त्यांना कुणी प्रतिबंध केला होता? पण आपल्या प्रमाणंच त्यांनीं इकडचंहि मन विरक्त बनविण्याचा प्रयत्न केला, आणि आमचा संसार सारा व्हायचा राहिला असतां, आम्हांला अवेळींच तो साफ अंतरविण्याचा प्रसंग आणला आहे! वन्सं—

(चाल-सुध बिसरगइ आज)

अझुनि तरि संसारसुख पाहिलें काय ॥ इतुक्यांत
निःसार ह्मणूं समज हा काय ॥आ० ॥ परमार्थि
अधिकार व्हायास सदुपाय ॥ भोगाविण विकार
उपशामतील काय ॥ अ० ॥

(रूपक्या व अतिशयोक्ति भांडत येतात.)

रूपक्या।-चल हो पुढं. हो पुढं; आता कां नागिणीसारखी फुसफुसतेस ? जोगीणना माझ्या बरोबर बनणार आहेस तूं ? चल तर मग; पण तुसं कशाला; ह्या पहा इथं, जशा कांहीं गंगा यमुना किंवा लक्ष्मी पार्वती, तशा आमच्या राणीसाहेब आणि ताईसाहेब बसल्या आहेत. त्याच न्याय करितील आपला.

मोहनाराणी-रूपक्या, काय चाललं आहे तें, तुमचा नेहमीं-चाच आपला विनोद आहेना ?

रूपक्या-(अतिशयोक्तीस)-हं सांग आतां.

अतिशयोक्ति-मी नाहीं; म्हटलं आपणच सांगायचं होतं.

रूपक्या-बरं आहे. मी सांगतों. हं राणीसाहेब, तुम्हीच आतां सांगा बरं ?—

मोहनाराणी-मी सांगूं ? आंन् मग तूं काय सांगायला आला आहेस तें ?

रूपक्या-तसं नव्हे, आमचा तंटा ऐकून मग तुम्ही त्याचा न्याय सांगा, असं माझं म्हणणं !

मोहनाराणी-बोल तर काय तें.

रूपक्या-हें पहा, मी म्हणतों न्यायाधिशाची बायको जशी न्यायाधिशीण, कोशाधिपतीची बायको जशी कोशाधिपतीण, सैन्यांतला नायक असतो त्याची बायको जशी नायकीण—

चंपावती-नायकीण !

रूपक्या-ऐका तर खरं. प्रजाजनांतल्या एखाद्या उत्तम कसबी मनुष्याची बायको जशी कसबीण—

मोहनाराणी–मेल्या बडबडतोहेस तरी काय हें?

अतिशयोक्ति–राणीसाहेब, हा रूपकांचा प्रकाश पडत असून त्यानं भाषेच्या सर्व पोक्तपणाला आग–नव्हे उजळा–लावून देण्याचं चालवलंय हें!

रूपक्या–बरं बरं. त्यांत आणखी अतिशयोक्ति नको आहे!

मोहनाराणी–हाच का तुमचा तंटा; आन् याचा का न्याय निवडून घ्यायला माझ्या पुढं असे भांडत आलात हें?

रूपक्या–तसं नव्हे; पण जशी शिक्षकाची बायको शिक्षकीण, ज्योतिष्याची बायको ज्योतिषीण, हरदासाची बायको हरदासीण, संन्याशाची बाय––

चंपावती–संन्याशाची!

मोहनाराणी–(दासींना)–आग मेल्याच्या चांगली तोंडांत; वात्रट कुठला!

दासी (रूपक्यास)–संन्याशाला बायको असते कायरे. (त्याला मारायला जातात.)

अतिशयोक्ति–(दासींना आडवून) हां खबरदार; माझ्या समक्ष आंगाला तुम्हीग कोण हात लावणार!

मोहनाराणी–मग आमच्या समक्ष तूं देणार का आपल्या नवऱ्याच्या तोंडांत, त्याच्या अशा वात्रटपणाबद्दल?

चंपावती–आहे वाटतं नित्यांतला परिपाट?

रूपक्या–पण कुणीच एवढी तसदी घेऊं नका कशी. आपलं गाऱ्हाणं उदाहरणांनीं नीट पटवून सांगण्याच्या भरांत बोलण्यांत चुकलों म्हणून मीच आपल्या तोंडांत मारून घेतों ही! झालं? पण आमच्या तंट्याची गोष्ट राहिलीच.

मोहनाराणी–सांग तर मग नीट ती.

रूपक्या–माझं म्हणणं असं कीं, न्यायाधिशीण, ज्योतिषीण; हीं जशीं त्यांच्या बायकांचीं नांवं असतात, तसं मी आतां जोगी बनलों म्हणजे ही माझी बायको अर्थात् जोगीण नाहीं का होणार

अतिशयोक्ति–नांवानं नुसतं म्हणेनात कुणी मला तसं; पण मी आपलं चांगलं चोळी लुगडं नेसायाचं आन् दागदागिने घालायचं टाकून तुमच्या बरोबर भगवं पटकुर लावून झोळी घेऊन भिक्षा मागायला नाहीं दारोदार यायची! तुमच्याच दाखल्याप्रमाणं कां होईना, मी म्हणत्यें कीं न्यायाधिशाची बायको न्यायाधिशीण असते, म्हणून न्यायसभेमध्यें त्याच्या बरोबर जाऊन न्याय का करीत असते; किंवा सेनापतीची बायको सेनापतीण झाली म्हणून ती ढाल तरवार बांधून लढाईवर का जात असते?

चंपावती–बरोबर आहे हिचं म्हणणं हें.

रूपक्या–मग आम्ही मात्र आंगाला राख फांसून गांवांत भिक्षेला जावं, आन् हिनं—

अतिशयोक्ति–चांगलं चोळी लुगडं नेसून आणि घरांत बसून आपण भिक्षा आणाल त्यावर खुशाल संसार करावा!

रूपक्या–वः, हा का न्याय झाला!

अतिशयोक्ति–आन् मग घरदार बायका मुलं असा चांगला संसार असतां तो बळं मोडून भिकार जोग घ्यावा हा तरी न्याय झाला का?

चंपावती–पण देवाच्या दयेनं संसार चांगला अनुकूल असतां जोगी होण्याचे हे भिकार डोहाळे कां?

मोहनाराणी–बरोबर म्हटलंत; जोग कुणी घ्यावा—

(चाल–प्रणयतरंगासवें.)

सुलभ भोग ज्या नसे ॥ उचित जोग त्या असे ॥ निर्धनें निर्गुणें प्रभुपणें न मिरवणें ॥ जरि न येइ राहुणें ॥ सुल० ॥ जवळि सुख न ज्या दिसे ॥ दूर चिंतुनी असे ॥ प्रेम हृदयिं न हिंसे ॥ सहज विरतता वसे ॥

चंपावती–आणखी मी म्हणत्यें कीं, परमार्थच साधण्यासाठीं जोग घ्यायचा असेल तर संसारांत राहूनहि तो साधतां नाहीं कां येणार?

अतिशयोक्ति–पण बाईसाहेब, मैंढी हुरळून अशी लांडग्याच्या मागं लागावी, किंवा मोर नाचतो म्हणून लांडोरहि नाचावी, त्यांतले हकडचे चाळे आहेत हे!

मोहनाराणी—म्हणजे!

अतिशयोक्ती—तिकडे महाराजांनीं जोग घेण्याची तयारी केली ती पाहून हीहि स्वारी आंगांतले कपडे फाडूं लागली!

मोहनाराणी—(घाबऱ्यानें उठून)–अगबाई, काय म्हणतेस. तिकडे जोग घेणें झालं?

चंपावती—काय, माझ्या दादानं जोग घेतला?

अतिशयोक्ति—होय ताईसाहेब, आत्तांच मासाहेबांच्या विनंतीवरुन जालंधरनाथांनीं त्यांना जोगी बनवलं. महाराजांनीं आंगावरलीं सर्व उंची वस्त्रं आणि रत्नालंकार काढून आंगाला राख फांसली आहे, कौपीन चढवून कफनी घातली आहे. नाथदीक्षेप्रमाणें शैलीशृंगी धारण केली आहे. तें आतां या जोगी वेषानं शहरांत भिक्षेसाठीं निघून फिरत फिरत आपल्या महालाकडेहि येणार आहेत.

मोहनाराणी—झालें बाई! वन्सं मला भीति होती तीच अखेरिला खरी ठरली!

(चाल–अहा प्रभो काय अशी.)

ऐकियलें शेवटिं मी काय बाइ हें असें॥ कल्पनेंहि ज्याच्या॥ भिवविलें मनाला॥ अप्रिय तें प्रत्ययास आज मजसि येतसें॥ ऐकि०॥

चंपावती—वहिनी, काय सांगूं तुला मी. अग—

(चाल–जलभृत मेघध्वनिसम हा.)

किति हौसं धरुनि मी आल्यें॥ भेटाया प्रिय बंधुस परि हें अप्रिय ऐकियलें॥ मन कुंठित होउनि गेलें॥ कांहिं सुचेना काय काय करूं गे ऐसें मज झालें॥ किती०॥

अतिशयोक्ति—ही आमची स्वारी त्यांच्याच बरोबर मग जोगी बनून निघायला तयार झाली होती; पण मी हट्टानं आडवून इकडे घेऊन आल्यें ही.

मोहनाराणी—गडे बन्सं मीहि त्यांना असंच आडवून इकडे घेऊन येऊं का ? माझं ऐकायचं होईल ? बन्सं तुह्मीहि आहांत या वेळीं चार गोष्टी सांगून मन वळवायला. चला ह्मटलं जाऊं या तिकडे.

चंपावती—पण आतां जाऊन काय उपयोग. योगदीक्षा तर धारण केलीच आहे. आतां इथं गांठ पडल्यावर कांहीं सांगून मन वळवतां आल्यास पहावं.

मोहनाराणी—(अतिशयोक्तिस)—कायग, तूं ह्मटलंस कीं स्वारी इकडे येणार आहे, खरं ना ?

अतिशयोक्ति—होय. या योगदीक्षेबद्दल जालंधर नाथांनीं महाराजांजवळ दक्षिणा हीच मागितली आहे कीं, त्यांनीं आतां सर्व शहरांत आणि महालांतल्या स्त्रियांकडे भिक्षेला निघून जी भिक्षा मिळेल ती गुरुदक्षिणा ह्मणून त्यांस द्यावी. महाराजांच्या या भिक्षेचा आरंभ मासाहेबांच्या महालापासूनच झाला आहे. महाराजांना अशा विरक्त मार्गाला लावण्याचा सर्व मूळ प्रयत्न जरी मासाहेबांचाच होता तरी आपल्या राजविलासी पुत्रानं तो भिकारी जोगवेष घेतलेला पाहून त्यांच्या डोळ्यांतनं खळखळां अश्रुधारा वाहूं लागल्या ! महाराजांच्या झोळींत भिक्षा घालतांना त्यांचे हात थरथरां कांपूं लागले ! दोघं सद्गदित झालीं ! उभयतांच्या मुखावाटे एक शब्द निघेना ! शेवटीं जालंधर नाथांनीं निष्ठुरपणानं ओढल्यामुळं महाराज कसे तरी तिथनं निघाले; पण त्यावेळीं तिथं मागं सर्वांच्या मनाला एकदम विलक्षण कांहीं धक्का बसल्याप्रमाणं होऊन मोठाच हाहाःकार उडाला ! वाड्यांतले दासदासी, शिपाई इत्यादि, मंत्रीमानकरी यांना तर तो प्रसंग पाहून दुःख झालंच; पण काय सांगूं बाईसाहेब, महाराज वाड्यांतनं निघतांच, पिंजऱ्यां-

तले क्रीडापक्षी, पागेंतले गजतुरंग, बागेंतल्या वृक्षवेली ह्या सुद्धां कष्टी होऊन दळदळां अश्रु ढाळतांना दिसूं लागल्या ! हा भिक्षा-विधि संपल्यावर महाराज अशाच वेषानं बारा वरसं तीर्थयात्रेसाठीं जाणार आहेत असं ऐकल्यें.

मोहनाराणी–माझा तर बाई हें ऐकून धीरच खचला अगदीं !

चंपावती–अशा स्थितीत दादांकडे माझ्यानं आतां पहावेल तरी कसं !

(पडद्यांत " अहलख " शब्द ऐकूं येतो.)

अतिशयोक्ति–अगबाई ! आली वाटतं महाराजांची स्वारी इकडे !

चंपावती–चल वहिनी; यावेळीं घट्ट मन करून मोठ्या धैर्या-नंच प्रसंगाला सादर असलं पाहिजे.

मोहनाराणी–चला बाई !—

(चाल–चालु ठाकुरमां जइ वासी.)

हतदैवा मी वनवासी ॥ पति घेति फकीरी होती उदासी ॥ हतदैवा० ॥ गृहधनदारा विषयपसारा अ-सुनी सुंदर तो सारा ॥ नाहिं अजुनी अनुभवला तों उपजे विरतिच ही कैसी ॥ हत० ॥

(जातात.)

(प्रवेश २ रा.)

(गोपीचंद फकीरी वेषानें येतो.—स्थळ, महालाचा बाहेरील भाग.)

गोपीचंद—

(चाल—जान हमारी अब तनसे.)

घाबरतें कां अजुनी मन हें कळेना ॥ घाब० ॥ गुरु-क्रोधाब्धी जें तरलें ॥ मातृमोहसरिता उतरलें ॥ काय या स्त्रीप्रेमौघा ॥ त्यास लंघवेना ॥ घाब० ॥

—मला वाटतं मी या मनाची प्रतिष्ठा फार ठेवतों. म्हणूनच तें मला वारंवार भिववतंय असं. चला, आपण आतां त्याचा विचारच करूं नये. गुरुनाथांच्या आज्ञेप्रमाणं या महालांत जावं आणि भिक्षा मिळेल ती गुरुचरणीं सादर करावी.—

(भजन.)

दे मोरी मय्या ॥ सुन मोरे भय्या ॥ मुठ्ठीभर आटा रे ॥ करम मेरा छूटा ॥ दे मोरी० ॥ फकिरी मिली मुझे ॥ गुरु साहिबसे ॥ भवभय टूटारे ॥ करम० ॥ दे मो० ॥

(मोहना व चंपावती धांवत येऊन गोपीचंदास मिठी मारतात.)

मोहनाराणी—प्राणनाथ, आपण काय असं विपरीत केलं हें !

चंपावती—दादा, ह्याच कारे वेषानं तुला पाहायला इथं आल्यें ही मी !

मोहनाराणी—प्राणनाथ.—

(चाल—तनवारिदा.)

वरिलें प्रिया ॥ विरतीस या कां ॥ वरि० ॥ विषयाभिलाषी ॥ तनु ही विलासी ॥ तिजला उदासी ॥ बनवूनियां कां ॥ वरि० ॥ स्वरुपें भिकारी ॥ प्रिय नाशकारी ॥ ममतेस मारी ॥ विषारी बया ॥ कां ॥ वरि० ॥

चंपावती—दादा, असलं खडतर व्रत पत्करायला तुझं तसं अनुकूल वय तरी झालं आहे कारे ?

मोहनाराणी—प्राणनाथ आपल्या विलासी देहाला ही उदासी दीक्षा सहन तरी कशी होईल ?

चंपावती—खरंच दादा, अरे—

(चाल—एक चतुर नार कर कर शृंगार.)

जी जातिकुसुमसुकुमारमृदुल ॥ विधुचीहि कांति तुलनेसि अतुल ॥ तनु केंवि कठिण हा जोग वरिल ॥

॥ जी० ॥ तशि तप्त हेमगौरांग रुचिर ॥ सुखकेलिभवन वनवासि बनुन ॥ तनु० ॥ जी० ॥

मोहनाराणी—प्राणनाथ आम्ही आतां कुणाकडे पाहून आपलं आयुष्य कंठावं बरं ? प्राणावांचून कुडी तसं आपल्यावांचून आम्हां सर्वांचं होणार नाहीं काय ?—

(चाल—हूं तो करुंगी हरीसंगरा.)

केलें काय प्रिया भलतें ॥ सलतें हें नयनीं ॥ पाहुनी ॥
॥ के० ॥ झालें शून्य खरें जग शोकभरें ॥ रूप
विपरित हें न बरें ॥ उलवी हृदया ॥ पाहुनी ॥ केलें०॥

चंपावती—दादा, परमार्थ सिद्धीसाठीं हाच मार्ग कुठून बरं तुला योग्य वाटला ? अरे—

(चाल—मी समजुं तरी काय भुले मन.)

ती त्यजिलि वद काय शिवें सति ॥ ती त्य० ॥
प्रकृति पुरुष हा योग अनादि ॥ सर्व जगस्थिति
सिद्ध तयावरि ॥ ती त्य० ॥ वस्तु न सोडी कधि
छायेतें ॥ काय त्यजी बिंबही प्रभेतें ॥ उपेक्षुनीया
सुखसंसृतितें ॥ विफलचि होतिल योगतपादिक
तीं ॥ त्य० ॥

मोहनाराणी—प्राणनाथ, आमचा असा घात करूनच काहो यांत आपल्याला परमार्थसुख मिळवावंसं वाटलंय हें ?

गोपीचंद—प्रिये—(चपापून)—पण शिव शिव ! नेहमींच्या संवयीमुळं हे काय शब्द माझ्या तोंडांतून निघाले ! गुरुनाथ, गुरुनाथ !—

(चाल—हे हे हे मन तूं काहे जले.)

हे हे हे मन तूं सावध रे ॥ हे० ॥ श्रवण मनन
अभ्यास करुन दृढ बुद्धिस विवेक पावला ॥ तो तूं
या समयिं जागिव रे ॥ हे हे० ॥ कोण कुणाची प्रिया

अतां ती कोणाचा प्रिय नाथ ही ॥ पूर्विल आश्रम सुटतां तुटलें ॥ पहिलें नातें अपाप सगळें ॥ हे हे० ॥

मोहनाराणी.–हा रे कर्मा ! काय मी आपली आतां प्रियाई राहिल्यें नाहींना ? मग आतां एवढं तरी करा ह्मंजे झालं.— (पायांशीं बसून)

(चाल–खलबलीने यारो जियरवा.)

+तनु बधूनि आर्धी निजकरिं तरि ॥ मुक्तता करावी॥ ॥ अमुची मु० ॥ भीरुदुर्बलादिक धर्मै ॥ या भवार्णवातें ॥ तरेल एकली कैंची ॥ तनु० ॥

चंपावती–दादा, परमार्थप्राप्तीच्या मार्गाला लागतांना, आपलं आप्तप्रिय माणसं अशींच जर तुडवून जावं लागत असेल तर एक पाय माझ्याहि आंगावर देऊन जा ह्मणत्यें.

(दोघी पायांशीं लोळण घेतात.)

गोपीचंद–हें काय बरं ताई असं—पण नव्हे. ह्याच तो प्रेम पाश. (दोघींना झिडकारून)—

(चाल–नयनाश्रूंनीं अभिषेक०)

मन या मोहें अविकृत तरि तें कैवल्य पावे ॥ वैराग्याची निश्चलता ॥ ज्ञानाची किति पूर्णता ॥ प्रसंग हे या परीक्षणाचे ॥ जाणूनि जावें ॥ मन० ॥

(जाऊं लागतो.)

+ या पदाऐवजीं पाहिजे तर हेंहि पद ह्मणावें:—

(चाल–सुनई दिलदार.)

वधावी ही प्रिया अपुली अर्धी स्वकरें ॥ धरा मग मार्ग मोक्षाचा दिसेल बरें ॥ भीरु दुबळी परालंबी तनु स्त्रीची ॥ कशी एकाकि दुस्तर हा भवाब्धि तरे ॥ वधावी० ॥

चंपावती–(उठून त्याला आवळून)—दादा मी तुला जाऊं देणार नाहीं !

मोहनाराणी–आम्ही म्हटलं आपल्याला असें आवळून धरूं !

गोपीचंद–(आपल्याशीं भजन करीत)—

(चाल–उचित नसे भरता.)

मुक्त दिशा ज्याला ॥ केलें बद्ध कुणी त्याला ॥ मु० ॥
दुग्धपटाची घडी कधीं ती ॥ उकले कवणाला ॥
॥केलें०॥ अंकुर येइल काय पेरिल्या ॥ भर्जित बीजा-
ला ॥ केलें० ॥

चंपावती–बरं तर, दादा तुला असं जोग घेऊनच राहायचं असेल तर राज्याचा व आह्मां आप्तप्रिय माणसांचा असा निष्ठुर-पणानं त्याग करून न जातां इथंच एखादा सुंदरसा मठ बांधून राहिलास तर नाहीं का चालायचं ?

मोहनाराणी–अशाहि स्थितींत आपली रात्रंदिवस सेवा आ-ह्मांला करतां येईल. या कठिण जोगदीक्षेचे कष्ट आपल्या सुकुमार देहाला अगदीं होऊं देणार नाहीं.

गोपीचंद–(आपल्याशीं)–अहाहा ! गुरुनाथ आपल्या कृ-पेचा प्रभाव काय सांगावा !–

(चाल–चिंति मन हें.)

सर्व हे उपचार सांप्रत निष्प्रयोजन जाहले ॥ गुरुकृपें
मज देहविषयक मुळिं ममत्व न राहिलें ॥ भूमि
शय्या, भुज उशी, शशिसूर्य दीपक होउनी ॥ दिशा
वसनें, शांति वनिता, उन्मनी सुख, या जनीं ॥

(जालंधर व मैनावती येतात.)

जालंधरनाथ–शाबास बच्चा ! देख मैनावती, इस भवसमुं-दरके जनममरणरूप भंवरेमें आदमीको घुमानेवाला जो मायामोह है, उससे यह तेरा बेटा बिलकुल परे होगया है. अब इसको यह

संसारजालका कुछभि डर बाकी नहीं रहा. धन्न है बेटा गोपीचंद तूं.

(गोपीचंद पायां पडतो.)

मैनावती–ही सर्व सद्गुरुमहाराजांची कृपा आहे.

मोहनाराणी–पण गुरुमहाराज, प्राणनाथांना अशा विरक्त मार्गाला आपण लावलंत, त्या वेळीं केवळ त्यांच्यावर अवलंबून ज्यांचं जीवित आहे, अशा आह्मां दीनदासीजनांविषयीं कांहींच कां विचार आपल्या मनांत आला नाहीं ! पति उदासवेषानं वनवासी झाल्यावर मागं आम्हां अबलांची गति काय व्हावी बरं ?

चंपावती–शिवाय आम्हां स्त्रियांना तरी परमार्थसिद्धीची अपेक्षां मुळीं नसावीच का कांहीं ?

जालंधरनाथ–हां माई. उस परमार्थ मार्गमें लगनेकी जोग्यता आनेका तुमकोभि यही एक जरिया क्यों न होगा ! अगर ये वख्त तुमपर न गुजरता तो इस बातका तुमको कभि खियालभि न होता. और इसी तरेह दुनियाके ऐश व अशरतके नशेमें हमेशा गाफिल होकर तुम पडे रहेते.

मोहनाराणी–पण महाराज, या मूढ दासीचं एक विचारणं आहे, तें असं कीं, ईश्वरी कृपेनं ऐश्वर्यसुखसंपन्न असा आपला असलेला संसार बळंच वैराग्यवृत्तीनं विच्छिन्न करून मग का परमार्थाची प्राप्ति करून घ्यावी लागत असते ती ?

जालंदरनाथ–ऐसा नहीं है माई. जब इनसान दौलतके पुरे जोषमें रहेताहै तब वो यह नेकरास्ता बिलकुल भूल जाता है. अगर उसको यकायक किसीवजेसे दिखलाइभि दिया तो वो उसको बेफायदा समझता है. और उसकी चोहोलभि करता है. इसवास्ते ऐसे बेवकूफी और मगरूरीको इसी तरेहके पेंचमें गिरफ्तार करके होषमें लाना जरूर होता है.

चंपावती–पण आमचा दादा आतां. आपण नुकताच त्याचा धन्यवाद केल्याप्रमाणं, आसल्या मोहविषादजनक प्रसंगांतनं आपल्या कृपेनं मुक्त होऊन योग्य अधिकारी ठरला आहे; होय ना ?

जालंधरनाथ—हां भाई. और इसीवास्ते अब उसको ऐसे फकीरी भेकमें रखनेकी कोई जरूरत नाहीं. वो अब मिथिलाधिपति जनकराजाकी तरह गिरस्तीमें रहेकर परमार्थका सुख चखते रहेगा. और आपनी सुसंगतसे तुम ऐसे केवळ बिलखी जनोंकोभि उसी राहकी पहेचान करा देगा. सुन मैनावती, अब जाव, और गोपीचंदको अच्छी तरहसे न्हिलाधुलाकर राजभूखन और जेहवर पेहनाकर ले आव.

गोपीचंद—गुरुमहाराज, मला आतां पुन: या प्रपंचबंधनांत कशाला पडूं देतां ? आपल्याकृपेनं अनायासानं मी यांतनं मुक्त झालों आहे. आतां याच स्थितींत ही उर्वरित देहयात्रा संपावी हें इष्ट नव्हे काय ?

जालंधरनाथ—नहीं, बेटा. यह तेरा खियाल गलत है. जबतक आदमीको देहसंबंध है तबतक प्रपंच उससे हरगीज दूर नहीं हो सकता. क्यों के जिंदगीके लिए हरएकको किसीतोरसे किसीतरेहकी प्रपंचकी निशाणी कायम रखना जरूर पडती है. उसमें लिहाज व खियाल इतनाहि लाजम है के प्रपंचके रब्बाबेलरगोषमें मुबतिला न रहे. और आपने ग्यान दृष्टीको कायम रख्खे. और इसबातका मुजको यकीन व यतमीनान हो चुका है, के, फिलहाल जो तुजको बैराग्यका तजरुबा कामिल हुवा है, इसलिये तेरेसे ऐसा कोई गफलत फिर कभी न होगा. सिवाय इसके हम जैसे परमार्थका उपदेस करते फिरनेवालोंकी कुदबसरी प्रपंची लोगोंके जरियेसेहि होती है. इसवास्ते अच्छी तरहसे प्रपंच करना वो हमारी खिदमतगुजारी है और उसीमेंहि, तेरा जैसा खियाल है, वो परमार्थ है.

गोपीचंद—उत्तम आहे. जशी आपली आज्ञा.

मोहना व चंपावती—(नम्र होऊन)—

(चाल—पुरा प्रल्हाद.)

कृपा घडली ॥ घडलि ही आंरि ॥ करी आम्हास

आभारी ॥ कु० ॥ वर्षुनि जीवन जीवनदानें सुवेळि तरुवेली ॥ केलि जशी टवटवीत किरुनी ग्रीष्में जी सुकली ॥ तसे या काळीं ॥ अम्हाला आलि ॥ सनाथदशा पुन्हा पहिली ॥ कु० ॥

(रूपक्या व अतिशयोक्ति यांच्या शिवाय सर्व जातात.)

अतिशयोक्ति—कां, आतां कसा काय बेत आहे ! म्हटलं भोगी का जोगी !

रूपक्या—बेत काय ? जो महाराजांचा तो आमचा. बोकडाच्या तोंडाबरोबर जशी त्याची दाढी हालते तसेच आह्मीहि महाराजांच्या गतीनं चालत असतों.

अतिशयोक्ति—शेवटीं पण खरं कुणाचं झालं ? एकंदरींत सर्वांत श्रेष्ठ भोगच ठरला ना !

रूपक्या—तरी बघ निद्रेवांचून जसं स्वप्न नाहीं, किंवा रूपक आणि अतिशयोक्ति यांवांचून जसं काव्यनाटक नाहीं, तसं योगावांचून भोग नाहीं !

अतिशयोक्ति—तो कां आतां ?

रूपक्या—इकडे ये जवळ ह्मणजे सांगतों.

अतिशयोक्ति—घ्या ही आल्यें. सांगा आतां.

रूपक्या—(तिच्या गळ्यांत हात घालून) हा योग झाला. आतां अगोदर असा योग असल्यावांचून (चुंबन घेऊं लागतो) कोणताच भोग सुलभ नाहीं! (ती निसटून दूर पळते.) कां पटलं माझं म्हणणं !

अतिशयोक्ति—माणसाचं मेलं असं तोंडच बंद केल्यावर कोण नाहीं निरुत्तर होणार ! पण पुरे आतां. तें पाहिलंत का—

(येथें पुढील भाषणाप्रमाणें जाळीच्या पडद्यांतून मागें सर्व दरबाराचा देखावा दिसूं लागतो.)

—महाराज पुनः आपल्या राजतेजानं चमकूं लागतांच सगळ्यांचीं मुखं कशीं टवटवीत दिसूं लागलीं.

रूपक्या—सूर्योदय होतांच वनश्री प्रफुल्लित दिसूं लागावी तशी!

अतिशयोक्ति–चहूंकडे अगदी आनंदी आनंद भरून गेला आहे!

रूपक्या—पुष्पांच्या व धूपाच्या परिमलानं जसं देवगृह, कुशल गायकांच्या व मधुर वाद्यांच्या स्वरानं जसं प्रेक्षागृह, अथवा पाकपाकांच्या घमघमाटानं जस भोजनगृह परिपूर्ण भरून जावं तसं!

अतिशयोक्ति–बंदीजन महाराजांची स्तुति करताहेत, प्रजाजन त्यांच्या दर्शनासाठीं वाड्याकडे धांवताहेत, परिजन त्यांच्या सेवेला सादर होताहेत, गुरुजन त्यांना आशीर्वाद देताहेत, प्रणयीजन त्यांना पंचारतीनं ओंवाळताहेत, साधुजन त्यांचा धन्यवाद गाताहेत–

रूपक्या--आणि दुर्जन हे मागं आपण केलेल्या निंदेबद्दल पूर्ण लज्जित होऊन वृक्षाच्या कोमेजलेल्या पानांप्रमाणं अधोवदन करून उभे आहेत!

अतिशयोक्ति–मछिंदरनाथ आणि जालंधरनाथ यांनीं स्वत: हातांनीं धरून महाराजांना राजसिंहासनावर बसविलं.

रूपक्या–मागं वसिष्ठ विश्वामित्रांनीं सत्वधीर ठरलेल्या हरिश्चंद्राला पुन: राज्यपदारूढ केलं त्याप्रमाणं.

अतिशयोक्ति–आपल्या पुत्रानं इह लोकचंच नव्हे तर त्रैलोक्यांचं स्वानंदसाम्राज्य श्रीगुरुकृपेनं मिळविलं याबद्दल मासाहेबांना किती किती धन्यता वाटते आहे!

रूपक्या–रावणवधानंतर श्रीरामचंद्राला किंवा भारती युद्धानंतर पांडवांना राज्याभिषिक्त पाहून कौसल्येला किंवा कुंतीला धन्यता वाटली होती त्याप्रमाणं.

अतिशयोक्ति–आमच्या राणीसाहेब व बाईसाहेब यांच्या आनंदाला तर पारावार नाहीं!

रूपक्या–अतिशयोक्तीचा वर्णनप्रकार जसा अमर्याद असतो तसा.

अतिशयोक्ति–आणि कोणत्याहि वर्णनांत झालं तरी रूपकं जशीं पातपुरत्याच अर्थांनीं मिसळलेलीं असतात त्याप्रमाणं अशाहि

या उत्सवातिशयांत तें पहा ते सगळे गोपीजन केवळ तात्पुरतेच दंग झालेले दिसताहेत !

रूपकथा—तें असो; पण हें पहा, कोणत्याहि गोष्टीचं दर्शन जोंपर्यंत दूर असतं तों पर्यंतच तिचं रुपकातिशयोक्तीनं वर्णन चालणं बरं. पण तेंच आतां प्रत्यक्ष होण्याचा योग आल्यावर तुम्ही आम्ही एकीकडे व्हावं हेंच बरं !

(दोघे दोहीं आंगांस होतात; पूर्वोक्त वर्णनाप्रमाणें दरबारचा थाटदार देखावा दृष्टीस पडतो.)

जालंधरनाथ—बच्चा गोपीचंद, यह राजजोगकु अच्छी तरहसे संभालना भला. फिर इस दुनियेके माया मोहसे बिलकुल भूलना नहीं. अब तेरी मनषा और क्या है ?

गोपीचंद—साई महाराज—

(दिंडी; भैरवी)

दिलें साम्राज्यचि मला त्रिभुवनाचें ॥ पार केलें भव-
वासमार्णवाचे ॥ शिरीं धरिलें छत्रही निज कृपेचें ॥
काय उरलें प्रिय अतां करायाचें ॥

—तथापि सर्वांच्या कल्याणारितां हें भरतवाक्य असो.

(पुढील पद्यानें वारांगनांचा नाच होतो.)

(चाल—किरदिगार तेरे हिसार०)

निगमसार ॥ श्रुतिविचार ॥ व्यथितमना सदुपचार ॥
अति उदार ॥ सुखउतार ॥ करि भवजलधितुनि
पार ॥ नि० ॥ बुधविहार सुमनहार ॥ विरतिस अणु
रतिस भार ॥ असार असार जरि पुकार ॥ वैभवा-
न्वित भवा ॥ बनवुनि अविकार्य, सुजवि ॥ दे अपार
अपार ॥ नि० ॥

समाप्त.